लोकसत्ता गुरुवार, १७ सप्टेंबर २००९
व्यापार - उद्योग

# 'आय.सी.डब्ल्यू.ए.आय.' आता होणार 'आय.सी.एम.ए.आय.'

**व्यापार प्रतिनिधीः** इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अ‍ॅण्ड वर्क्स अकाऊण्टट ऑफ इंडिया (आय.सी.डब्ल्यू.ए.आय.) आता लवकरच इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अ‍ॅण्ड मॅनेजमेण्ट अकाऊण्टट ऑफ इंडिया (आय.सी.एम.ए.आय.) म्हणून ओळखली जाईल.

केंद्रीय कंपनी व्यवहारमंत्री सलमान खुर्शिद यांनी आय. सी. डब्ल्यू. ए. आय.च्या नाव बदलाची मागणी तत्त्वतः मान्य केली आहे. याविषयी बोलताना खुर्शिद यांनी सांगितले, की आय. सी. डब्ल्यू. ए. आय. अ‍ॅक्टमध्ये काही बदल करावे लागणार असून, त्यावर काम चालू आहे. नजीकच्या भविष्यात हे बदल अमलात आणले जातील. कॉस्ट अकाऊण्टना उत्पादन वाढविण्याच्या प्रक्रियेत अतिशय महत्त्व असून, या बदलामुळे त्यांच्या कामाशी साधर्म्य असणारे नाव त्यांना मिळेल.

यावर प्रतिक्रिया देताना आय. सी. डब्ल्यू. ए. आय.च्या पश्चिम विभागाचे अध्यक्ष मनुभाई देसाई यांनी आनंद व्यक्त केला व यामुळे संस्थेच्या प्रतिष्ठेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

नाव बदलामुळे कॉस्ट अकाऊण्टट जे काम करतात त्याला सुयोग्य प्रतिनिधित्व मिळेल. कॉस्ट अकाऊण्टटना खरे तर निव्वळ नोंदी ठेवण्याच्या पुढे जाऊन मॅनेजमेण्ट अकाऊण्टट म्हणूनही काम करावे लागते, असे पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष अमित आपटे यांनी सांगितले.

चेतना व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राध्यापक व कॉस्ट अकाऊण्टट आशिष थत्ते यांनी सांगितले, की ''आयसीडब्ल्यूएआयचा उदय लंडनमधील चार्टर्ड इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट अकाऊण्टट (CIMA) च्या धर्तीवर झाला होता. सदर संस्थेने सत्तरच्या दशकातच कॉस्ट अकाऊण्टट हे नाव बदलून मॅनेजमेण्ट अकाऊण्टट केले होते. पाकिस्तान व बांगलादेशसारख्या विकसनशील देशांमध्येही हा बदल खूप आधीच घडून आला आहे. या बदलामुळे मॅनेजमेण्ट अकाऊण्टिंगसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात अमूलाग्र संशोधन होऊन त्याचा देशातील व्यापार वृद्धीच्या दृष्टीने चांगला उपयोग होईल.''

चौदाव्या लोकसभेपासून सरकारदप्तरी प्रलंबित असलेला पण अन्य व्यावसायिक संस्थांच्या राजकीय दबावाने थांबलेला हा बदल आता लवकरच संसदेमध्ये पारित होईल व आयसीडब्ल्यूएआयला 'आयसीएमएआय' असे नवीन व सुयोग्य नाव मिळेल, अशी आशा कॉस्ट अकाऊण्टट व्यक्त करीत आहेत.